| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/सिआर | दिनांक ३१.०३.२०२० |

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

प्रति,

**सर्व तहसिलदार,**
**नांदेड जिल्हा**

विषयः- COVID-१९ विषाणुंचा प्रादुर्भाव- लॉकडाऊन कालावधीत कामगार,बेघर, विस्थापीत परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी तालुक्यात उभारण्यात आलेल्या शिबीर (Camp) ला दैनंदिन भेटी देणेबाबत .

**संदर्भः-** १) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २९.०३.२०२०

२. या कार्यालयाचे समक्रमांकित पत्र दिनांक ३०/०३/२०२०

उपरोक्त विषयी लॉकडाऊन आदेशामुळे बंद झालेल्या उद्योग व्यवसायातील, साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समितीतील प्रभावीत झालेले **कामगार, परराज्यातील विस्थापीत कामगार,** यांचे स्थलांतरामुळे Lock Down व Social Distance उपाययोजनेच्या मानकाचे उल्लंघन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपणांस निर्देशीत करण्यात येते की, आपले अधिनस्त वरील सर्व आस्थापना प्रमुखां मार्फत अशा कामगारांच्या बाबतीत उपाययोजना करण्याबाबत सुचना दिल्या आहेत त्याची प्रत आपणास सुध्दा देण्यात आलेली आहे.

तसेच याव्दारे आपणास सूचित करण्यात येते की,आपल्या तालुक्यात अशा उभारण्यात आलेल्या कामगारांचे व इतर **शिबीर (Camp)** ला दैनंदिन भेटी देण्यात यावे. सदर ठिकाणी महसुल व पोलीस विभागाच्या कर्मचा-यांची नियुक्ती करावी. जेणेकरून असे कामगार व इतर व्यक्ती त्या शिबीरातून अनाधिकृतरित्या स्थलांतरीत होणाार नाही याची दक्षता घ्यावी व सदर ठिकाणी दैनंदिन किती कामगार/इतर व्यक्तीची वाढ होत आहे याचा सुध्दा दररोज अहवाल या कार्यालयातील समन्वय अधिकारी श्री. प्रसाद कुलकर्णी, तहसिलदार (सामान्य) dygennanded@ gmail.com यांना कळवावा.

तसेच सदर ठिकाणी यापुर्वी दिलेल्या सुचनाचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. जसे सदर ठिकाणी सामाजिक अंतर (Social Distance), शिबीरातील लोकांना सर्दी,ताप,खोकला अशा प्रकारची लक्षणे दिसल्यास औषधोपचारासाठी तात्काळ वेगळे करून संबधित वैद्यकीय अधिका-यांच्या सल्याने औषधोपचार चालु करावे. तसेच सदर ठिकाणी सर्व संबधितांची भोजनाची व्यवस्था समुह स्वयंपाकगृहाची व्यवस्था असली पाहिजे.अशा भोजनाच्या व्यवस्थेसाठी तालुक्यात अस्त्वित असलेले विविध स्वयंसेवी संस्था, उदयोजक, व्यापारी किंवा स्वंयस्फुर्तीने मदत करणारे व्यक्तींचा /समुहाची मदत घेण्यात यावी.

Scanned by CamScanner

या कामात दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरतुद व भारतीय दंड संहिताचे कलम १८८ नुसार कारवाईची तरतूद आहे, याचीही संबंधितांना सूचना द्यावी.

तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कामात दिरंगाई, निष्काळजीपणा केल्यास आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) पोलीस अधीक्षक, नांदेड
२) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
३) तहसिलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

Sd/-
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned by CamScanner